नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३३० Issue - 330 | वार मंगळवार दि. २१ एप्रिल २०२६ Blow- Tuesday Date 21 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## उधमपूरमध्ये प्रवासी बस खड्ड्यात कोसळून अपघात; १५ जणांचा मृत्यू

### काही जखमींची प्रकृती गंभीर; कघोट परिसरात वळण घेताना चालकाचे नियंत्रण सुटले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : जम्मू–काश्मीरमधील उधमपूर जिल्ह्यात भीषण रस्ते अपघाताची घटना घडली आहे. या दुर्घटनेतील मृतांची संख्या वाढून १५ वर पोहोचली आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात सोमवारी सकाळी रामनगर परिसरातील कागोट गावाजवळ घडला. एका प्रवासी बसचा डोंगराळ रस्त्यावर ताबा सुटल्याने ती खोल दरीत कोसळली.

माहितीनुसार, ही बस दुर्गम गावातून उधमपूरकडे जात होती. यादरम्यान हा अपघात घडला आहे. अपघाताच्या वेळी बसमध्ये मोठ्या संख्येने प्रवासी प्रवास करत होते. त्यामध्ये सरकारी कर्मचारी, शाळा व महाविद्यालयातील शिक्षक तसेच विद्यार्थ्यांचा समावेश असल्याचे सांगितले



जात आहे. सकाळी सुमारे ९.४० वाजण्याच्या सुमारास कघोट परिसरात वळण घेताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि बस दरीत कोसळली. या अपघातात अनेक जण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले आहे.

घटनेनंतर तातडीने मदत आणि बचावकार्य सुरू करण्यात आले. प्रशासन आणि पोलिसांच्या पथकांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना रुग्णालयात पोहोचवले. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, अपघाताच्या कारणांचा तपास सुरू आहे. परिसरात शोककळा पसरली असून प्रशासन परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे.

अपघातानंतर केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी उधमपूरच्या उपायुक्तांशी दूरध्वनीवरून चर्चा केली आणि गंभीर जखमींना एअरलिफ्ट करण्याची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती दिली. मदत व बचावकार्य वेगाने सुरू असून प्रशासनाशी सतत संपर्कात असल्याचेही त्यांनी सांगितले.

## सोलापूर महापालिका सभागृहात प्रचंड गोंधळ; नव्या योजनेला विरोध, दोन नगरसेवकांचे निलंबन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : शहरात नव्याने होणाऱ्या पाणीपुरवठा योजनेवरून आज महापालिकेच्या सभागृहात मोठा गोंधळ झाल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे, ऐन उन्हाळ्यात सोलापुरात पाणी तापलं असंच म्हणावं लागेल. सोलापूर महापालिकेतील शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे आणि काँग्रेसचे गटनेते चेतन नरोटे यांना निलंबित करण्याच्या सूचना महापौरांकडून देण्यात आल्या. त्यानंतर, सभागृहात मोठा गोंधळ उडाला, विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी सत्ताधाऱ्यांविरुद्ध घोषणाबाजी केली. दरम्यान, सोलापुरात सध्या ८ दिवसाला पाणीपुरवठा केला जात आहे.

सोलापूरचे महापौर विनायक कोंड्याल यांनी सभागृहात झालेल्या गोंधळानंतर विरोधी पक्षातील दोन्ही सदस्यांना आजच्या एक दिवसासाठी निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, भाजपकडे असलेल्या संख्याबळ आणि बहुमताच्या जोरावर नवीन पाणी पुरवठा योजना प्रचंड गोंधळातही मंजूर करुन घेण्यात आली. त्यानंतर, महापालिकेत विरोधी पक्षातील सर्व नगरसेवक आणि महापौरांनी विरोधात घोषणाबाजी करत सर्वांचे लक्ष वेधले.

सोलापूर महापालिकेच्या माध्यमातून १३७८ कोटी रुपयांची नवी पाणीपुरवठा योजना करण्यात येत आहे. मात्र, या पाणीपुरवठा योजनेवरुन भाजपमध्ये पुन्हा एकदा चांगलच राजकारण रंगल्याचं चित्र पाहायला मिळालं. भाजपचे दोन ज्येष्ठ आमदार विरुद्ध महापालिका पदाधिकारी यांच्यातला सुप्त संघर्ष या निमित्ताने पुन्हा एकदा पाहायला मिळाला. शहरातील पाणी पुरवठासाठी १३७८ कोटी रुपयाची जल वितरण सुधारणा योजना तयार करण्यात आली आहे.

या योजनेच्या आरखड्याला मंजूरी देण्याचा प्रस्ताव आज २० एप्रिल रोजी होणाऱ्या महापालिकेच्या सभेत मंजूर करण्यात आला. या योजनेच्या १३७८ कोटी रुपयांपैकी ६०० कोटी रुपयांचे कर्ज देणाऱ्या जागतिक बँकेने महापालिकेचे उत्पन्न वाढवण्यासाठी करवाढीचा पर्याय सुचवला आहे. मात्र, शहरावर नवीन करवाढ नको असे म्हणत भाजपचे आमदार सुभाष देशमुख आणि विजयकुमार देशमुख यांनी मनपा आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही आमदारांनी पालिका आयुक्तांना धारेवर धरत शहरावर कोणताही कर लादू नये अशा सूचना केल्या आहेत. दरम्यान, या सगळ्यावर महापालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांनी देखील भूमिका स्पष्ट केली.

**करवाढ करणार नाही : महापौर कोंड्याल**

पाणी पुरवठ्याचा विषय महत्वाचा असल्याने याच महिन्याचा सभेत अजेंडावर आहेत. पण, सभेच्यापूर्वी पार्टी मिटिंगमध्ये आम्ही दोन्ही आमदारांसोबत चर्चा करू. तसेच शहरावर कोणतेही कर वाढवले जाणार नाही, असे स्पष्टीकरण देखील कोंड्याल यांनी दिले. त्यामुळे, २० तारखेच्या सभेकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर प्रचंड गोंधळात ही योजना मंजूर करण्यात आली असून विरोधकांनी मात्र यास जोरदार विरोध केला.

## 'विकसित महाराष्ट्र २०४७'साठी ठोस कृती आराखडा; प्रादेशिक तफावत कमी करण्यावर सरकारचा भर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील प्रादेशिक तफावत कमी करून सर्व जिल्ह्यांचा समतोल आणि सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रत्येक विभागाने निश्चित कालमर्यादेत ठोस कृती आराखडा तयार करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

'विकसित महाराष्ट्र २०४७' या व्हिजन मॅनेजमेंट नियामक मंडळाच्या आढावा बैठकीत त्यांनी विविध विभागांच्या कामांचा सखोल आढावा घेतला आणि पुढील टप्प्यात प्रभावी अंमलबजावणीवर भर देण्याचे स्पष्ट केले. सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीस कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, वित्त राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल (ऑनलाइन), तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त असले तरी ११ जिल्हे अजूनही मागे आहेत. या जिल्ह्यांना 'विकासाचे इंजिन' मानून त्यांचा वेगाने विकास केल्यास राज्याच्या एकूण प्रगतीला चालना मिळेल. केंद्राच्या आकांक्षी जिल्ह्यांच्या धर्तीवर राज्यात १० आकांक्षी जिल्हे आणि १७४ आकांक्षी तालुके निश्चित करण्यात आले असून, स्थानिक पातळीवर विकासाचे मापदंड उंचावण्याचा प्रयत्न सुरू आहे.



शाश्वत विकास उद्दिष्टांच्या निर्देशांकात महाराष्ट्राला पुन्हा आघाडीवर आणण्यासाठी विभागनिहाय कृती आराखडे तयार करण्यावर त्यांनी भर दिला. नियोजन विभागाने तत्काळ मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात, तर वित्त विभागाने ३० एप्रिलपर्यंत प्रकल्पांचे आर्थिक मूल्यमापन पूर्ण करावे, असेही त्यांनी सांगितले. निधी उभारणीसाठी केंद्र–राज्य योजना, जिल्हा योजना, वित्त आयोग अनुदान आणि कर्ज पर्यायांचा योग्य समन्वय साधण्याचे निर्देश देण्यात आले.

'इज ऑफ डुईंग बिझनेस' सुधारण्यासाठी सार्वजनिक–खासगी भागीदारी आणि जमीन मूल्य धोरणांचा प्रभावी वापर करण्यावर भर देण्यात आला. केंद्राकडील निधी मिळवण्यासाठी उपयोगिता प्रमाणपत्रे वेळेत सादर करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. तसेच खाजगी गुंतवणूक, निर्यात आणि उपभोग वाढवण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

विभागांमध्ये समन्वय वाढवून जबाबदारीने काम करण्याचे निर्देश देत त्यांनी प्रगतीचे नियमित मूल्यमापन करण्याची गरजही अधोरेखित केली. 'विकसित महाराष्ट्र' या उद्दिष्टाशी सुसंगत असलेले प्रस्तावच पुढे स्वीकारले जातील आणि प्रत्येक प्रस्तावास त्याचे स्पष्टीकरण जोडणे बंधनकारक राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, मंत्री अतुल सावे यांनी निधी वेळेत खर्च होण्यासाठी स्पष्ट नियमावलीची गरज व्यक्त केली. मंत्री नितेश राणे यांनी भविष्यातील क्षेत्रांचा विचार करून थेट परकीय गुंतवणुकीचे नियोजन करण्याचा सल्ला दिला. तसेच प्रादेशिक समतोल राखत किल्ल्यांच्या संवर्धनासाठी केंद्राकडे पाठपुरावा करण्याची मागणी केली. वित्त राज्यमंत्री ड. जयस्वाल यांनी अनुसूचित जाती–जमातींच्या गरजांनुसार जिल्हानिहाय निधी नियोजन करण्याचे सुचवले.बैठकीत विविध विभागांच्या सचिवांनी पुढील चार वर्षांच्या विकास आराखड्यांचे सादरीकरण केले.

## चिप्सपासून जहाजांपर्यंत, भारत–कोरिया मिळून नवीन संधी साकार करतील : पंतप्रधान नरेंद्र मोदी

भारत आणि दक्षिण कोरिया यांनी त्यांच्या व्यापक आर्थिक भागीदारी कराराला (सीईपीए) अद्ययावत करण्यासाठी चर्चा सुरू करण्यास सहमती दर्शवली आहे. जागतिक स्तरावर वाढत्या भूराजकीय तणाव आणि व्यापारातील अडथळ्यांच्या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांच्या आर्थिक सहकार्याला नवी दिशा देण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष ली जे–म्युंग यांच्यात सोमवारी हैदराबाद हाऊसमध्ये झालेल्या द्विपक्षीय बैठकीनंतर ही घोषणा करण्यात आली. या दरम्यान दोन्ही देशांमध्ये अनेक सामंजस्य करार (एमओयू) आणि इतर महत्त्वपूर्ण करारांची देवाणघेवाण करण्यात आली.



हैदराबाद हाऊसमध्ये संयुक्त पत्रकार परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, चिप्सपासून जहाजांपर्यंत, कौशल्यापासून तंत्रज्ञानापर्यंत, मनोरंजनापासून ऊर्जेपर्यंत–भारत आणि कोरिया मिळून सहकार्याच्या नव्या संधी साकार करतील. त्यांनी या भेटीला द्विपक्षीय संबंधांसाठी महत्त्वपूर्ण टप्पा असे संबोधत सांगितले की दोन्ही देश आपली भागीदारी भविष्योन्मुख दिशेने पुढे नेत आहेत.

पंतप्रधानांनी सांगितले की भारत आणि दक्षिण कोरिया यांच्यातील द्विपक्षीय व्यापार सध्या सुमारे २७ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला आहे आणि २०३० पर्यंत तो ५० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी दोन्ही देशांनी अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलण्यावर सहमती दर्शवली असून त्यामध्ये भारत–कोरिया वित्तीय मंच स्थापन करण्याचाही समावेश आहे.

डिजिटल आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी इंडिया–कोरिया डिजिटल ब्रिज ही पुढाकार योजना सुरू करण्याची घोषणा करण्यात आली आहे. या अंतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर आणि माहिती तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांत संयुक्त प्रयत्न केले जाणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन्ही देशांमधील सांस्कृतिक संबंधांचा उल्लेख करत सांगितले की भारत आणि कोरिया यांच्यात हजारो वर्षांपासून ऐतिहासिक संबंध आहेत. त्यांनी अयोध्येची राजकुमारी सूरीरत्ना आणि कोरियाचे राजा किम–सुरो यांची कथा सांगत ती सामायिक सांस्कृतिक वारशाचे प्रतीक असल्याचे नमूद केले. त्यांनी असेही सांगितले की भारतात कोरियन पॉप संस्कृती आणि मालिका यांची लोकप्रियता वाढत आहे, तर कोरियामध्ये भारतीय चित्रपट आणि संस्कृतीबद्दल आकर्षण वाढत आहे. दोन्ही देशांनी २०२८ मध्ये भारत–कोरिया मैत्री महोत्सव आयोजित करण्याची घोषणा केली असून यामुळे सांस्कृतिक देवाणघेवाण अधिक वाढीस लागेल.

**राज्यातील सर्व शेतकऱ्यांना फायदा होणार आहे : चंद्रशेखर बावनकुळे**

## राज्य सरकारचा मोठा निर्णय; शेतजमिनीच्या वाटणीवरील नोंदणी फी रद्द

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा देत राज्य सरकारने शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर आकारले जाणारे नोंदणी शुल्क संपूर्ण माफ केले आहे. याबाबतचे परिपत्रक महसूल विभागाकडून आज जारी करण्यात आले आहे.

आता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ८५ अंतर्गत येणाऱ्या प्रकरणांसह, आपसातील संमतीने थेट दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीसाठी येणाऱ्या वडिलोपार्जित शेतजमिनीच्या वाटणीपत्रांनाही नोंदणी शुल्कातून पूर्णपणे माफी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री ददेवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहे.

शासनाने २३ जून २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार, कलम ८५ अन्वये एकाच कुटुंबातील सदस्यांनी केलेल्या शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर कोणतेही नोंदणी शुल्क आकारले जाणार नाही, अशी तरतूद करण्यात आली होती. या कलमांतर्गत वाटणीपत्राचे अधिकार




तहसीलदारांना आहेत. परंतु, अनेक नागरिक तहसीलदारांकडे न जाता थेट दुय्यम निबंधक कार्यालयात आपसातील संमतीने वाटणीपत्र नोंदणीसाठी सादर करत होते. अशा वेळी मूळ अधिसूचनेत स्पष्ट तरतूद नसल्याचे कारण देत दुय्यम निबंधक कार्यालयांकडून नोंदणी शुल्क आकारले जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते.

शेतकऱ्यांचा होणारा हा गोंधळ दूर करण्यासाठी शासनाचे महत्वाचे पाऊल उचलले असून महसूल विभागाने आता याबाबत स्पष्ट आदेश दिले आहेत. नवीन स्पष्टीकरणानुसार कलम ८५ अंतर्गत तहसीलदार स्तरावरून होणाऱ्या वाटणीपत्रांच्या नोंदणीसाठी कोणतेही शुल्क लागणार नाही. वडिलोपार्जित शेतजमिनीबाबत वारसा हक्क प्राप्त झालेल्या सर्व सहधारकांनी एकत्र येऊन थेट नोंदणी कार्यालयात सादर केलेल्या वाटणीपत्रालाही आता नोंदणी शुल्कातून सूट मिळेल.

एकाच कुटुंबातील सदस्यांमध्ये झालेल्या शेतजमिनीच्या वाटप दस्तावरही कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. या निर्णयामुळे शेतजमिनीच्या वाटणीसाठी होणारा खर्च वाचणार असून प्रलंबित वादांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.

एकाच कुटुंबातील सदस्यांनी आपसात वडिलोपार्जित जमीनीचे वाटप केल्यास त्याचे नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. हे अधिकार तहसीलदारांना होते. पण, काही लोक थेट दुय्यम निबंधक कार्यालयात जाऊन नोंदणी करत होते. त्यासाठीच्या नियमात स्पष्टता नसल्याने नोंदणी फी आकारली जात होती. ही अडचण दूर करण्यासाठी नव्याने हे स्पष्टीकरण देण्यात आले असून आता तहसीलदार किंवा नोंदणी कार्यालयात कुठेही गेला तरी नोंदणी फी भरावी लागणार नाही. याचा राज्यातील सर्व शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### शेतकऱ्यांना दिलासा

राज्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा देत राज्य सरकारने शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर आकारले जाणारे नोंदणी शुल्क संपूर्ण माफ केले आहे. याबाबतचे परिपत्रक महसूल विभागाकडून जारी करण्यात आले आहे. आता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ८५ अंतर्गत येणाऱ्या प्रकरणांसह, आपसा- तील संमतीने थेट दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीसाठी येणाऱ्या वडिलोपार्जित शेतजमिनीच्या वाटणीपत्रांनाही नोंदणी शुल्कातून पूर्णपणे माफी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री ददेवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहे. शासनाने २३ जून २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार, कलम ८५ अन्वये एकाच कुटुंबातील सदस्यांनी केलेल्या शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर कोणतेही नोंदणी शुल्क आकारले जाणार नाही, अशी तरतूद करण्यात आली होती. या कलमांतर्गत वाटणीपत्राचे अधिकार तहसीलदारांना आहेत. परंतु, अनेक नागरिक तहसीलदारांकडे न जाता थेट दुय्यम निबंधक कार्यालयात आपसातील संमतीने वाटणीपत्र नोंदणीसाठी सादर करत होते. अशा वेळी मूळ अधिसूचनेत स्पष्ट तरतूद नसल्याचे कारण देत दुय्यम निबंधक कार्यालयांकडून नोंदणी शुल्क आकारले जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. शेतकऱ्यांचा होणारा हा गोंधळ दूर करण्यासाठी शास- नाचे महत्वाचे पाऊल उचलले असून महसूल विभागाने आता याबाबत स्पष्ट आदेश दिले आहेत. नवीन स्पष्टीकरणानुसार कलम ८५ अंतर्गत तहसीलदार स्तरावरून होणाऱ्या वाटणीपत्रांच्या नोंदणीसाठी कोणतेही शुल्क लागणार नाही. वडिलोपार्जित शेतजमिनीबाबत वारसा हक्क प्राप्त झालेल्या सर्व सहधारकांनी एकत्र येऊन थेट नोंदणी कार्यालयात सादर केलेल्या वाटणीपत्रालाही आता नोंदणी शुल्कातून सूट मि ळेल. एकाच कुटुंबातील सदस्यांमध्ये झालेल्या शेतजमिनीच्या वाटप दस्तावरही कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. या निर्णयामुळे शेतजमिनीच्या वाटणीसाठी होणारा खर्च वाचणार असून प्रलंबित वादांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. एकाच कुटुंबातील सदस्यांनी आपसात वडिलोपार्जित जमीनीचे वाटप केल्यास त्याचे नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. हे अधिकार तहसीलदारांना हो- ते. पण, काही लोक थेट दुय्यम निबंधक कार्यालयात जाऊन नोंदणी करत होते. त्यासाठीच्या नियमात स्पष्टता नसल्याने नोंदणी फी आकारली जात होती.

# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना ३० जूनच्या आधी कर्जमाफी मिळणार, कृषीमंत्र्यांनी दिले संकेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आगामी खरीप हंगामावर 'एल निनो'चे सावट असून यंदा राज्यात दीर्घकालीन सरासरीच्या ९२ टक्केच पाऊस पडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर यंदा १४५.२० लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणीचे नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती राज्याचे कृषी मंत्री दत्त- ात्रय भरणे यांनी सोमवारी दिली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पात घोषित केलेली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना' ३० जूनच्या आत राबवली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

पुण्यातील शिवाजीनगर भागात नव्याने बांधण्यात आलेल्या 'सारथी'च्या सभागृहात खरीप हंगाम २०२६-२७ च्या पूर्वतयारीसाठी राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत भरणे बोलत होते. यावेळी कृषी आयुक्त सूरज मांढरे, महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी यांच्यासह विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



यंदा खरिपासाठी २०.१७ लाख क्विंटल बियाण्यांची गरज असून, २८.०५ लाख क्विंटल साठा उप- लब्ध आहे. खतांच्या बाबतीतही राज्य सुरक्षित असून, ४८.८० लाख मेट्रिक टन खतांचे आवंटन मंजूर झाले आहे. सद्यस्थितीत २५.१७ लाख मेट्रिक टन खत उपलब्ध असून, टंचाई भासणार नाही याची खबरदारी घेतल्याचे भरणे यांनी स्पष्ट केले.

दुष्काळाचा सामना करण्यासाठी तंत्रज्ञानाचा आधार

कमी पावसाच्या अंदाजाम ुळे कृषी विभागाने हवामान प्रतिरोधक बियाण्यांचा वापर, उताराला आडवी पेरणी आणि 'बीबीएफ' तंत्रावर भर देण्याचे ठरवले आहे. शेतकऱ्यांपर्यंत ही माहिती पोहोचवण्यासाठी 'महाकृषी' आणि 'महाविस्तार' पसह सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. तसेच नुकसानग्रस्त १३६ लाख शेतकऱ्यांसाठी २० हजार १९६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, अलीकडील अवकाळी पावसाचे पंचनामेही युद्धपातळीवर सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

## राज्यसभा टर्म संपत येताच खासदारकी ठेवण्यासाठी रामदास आठवले एकीची भाषा करतात, आनंदराज आंबेडकरांचा टोला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे : आता भोंदू बाबाच्या नादी नाही तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे वळण्याची गरज आहे असं म्हणत बुवाबाजीच्या मुद्यावरुन आनंदराज आंबेडकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी त्यांनी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्यावर देखील टीका केली. रामदास आठवले हे केवळ खासदारकी ठेवण्यासाठीच एकीची भाषा करतात असे म्हणत आनंदराज आंबेडकरांनी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्यावर निशाणा साधला. ते पंढरपूरमध्ये बोलत होते.

बुवाबाजीच्या मागे न लागता बाबासाहेबांच्याकडे वळण्याची गरज

पुरोगामी विचाराचा आणि सुशिक्षित असण- ारा महाराष्ट्र आज भोंदू बाबांकडे वळू लागला आहे. पण आता अशा बुवाबाजीच्या मागे न लागता बाबासाहेबांच्याकडे वळण्याची गरज असल्याचे वक्तव्य आनंदराज आंबेडकर यांनी केले आहे. सध्या महाराष्ट्रात एकापाठोपाठ एक खरात सारख्या बुवाबाजांचे कारनामे समोर येत असताना आनंदराज आंबेडकर यांनी अशा भोंदू बाबांकडे जाणाऱ्या सुशिक्षित लोकांवर निशाणा साधला आहे. केंद्रीय मंत्री रामदास आठवले हे जेव्हा त्यांची राज्यसभा टर्म संपत येते तेव्हाच एकीची भाषा करतात आणि दबाव टाकून आ- पली खासदारकी मिळवतात असा टोलाही आनंदराज आंबेडकर यांनी रामदास आठवले यांना लगावला. आज आनंदराज आंबेडकर हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त पंढरपुरात आले होते, त्यावेळी बोलत होते. आनंदराज आंबेडकर हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आहेत. ते दलित चळवळीत एक प्रमुख राजकारणी आहेत. आनंदराज आंबेडकर यांनी रिपब्लिकन सेना या राजकीय पक्षाची स्थापना केली आहे. आनंदराज आंबेडकर हे वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांचे धाकटे बंधू आहेत. आनंदराज आंबेडकर हे महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीतील प्रमुख नेतृत्व म्हणून आ- ेळखले जाते.

## जननी सुरक्षा योजनेतून मातृत्वाला सुरक्षिततेची हमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : मातृत्व ही जीवनातील सर्वात संवेदनशील व महत्त्वाची अवस्था. या काळात आई व बालकाच्या आरोग्याची काळजी घेणे ही समाजा- ची व शासनाची जबाबदारी आहे. याच उद्देशाने केंद्र शासनाने जननी सुरक्षा योजना राबवली असून, ग्राम ीण व शहरी भागातील हजारो महिलांना याचा थेट लाभ मिळत आहे.

योजनेचा उद्देश - माता व बालकांच्या मृत्यूचे प्रमाण कमी करणे. - महिलांना शासकीय आरोग्य केंद्रात सुरक्षित प्रसूतीसाठी प्रोत्साहन देणे.

लाभार्थी - अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच दारिद्र्यरेषेखालील सर्व गर्भवती महिला या योजनेच्या कक्षेत येतात.

लाभाचे स्वरूप - घरगुती प्रसूतीसाठी ₹५०० आर्थिक सहाय्य. - शासकीय किंवा शासनमान्य आरोग्य केंद्रात प्रसूती झाल्यास शहरी भागात ₹६०० व ग्रामीण भागात ₹७००. - सिझेरियन प्रसूतीसाठी थेट ₹१५०० मदत. - सर्व रक्कम लाभार्थीच्या बँक खात्यावर डीबीटी व पीएफएमएसद्वारे जमा केली जाते. आवश्यक कागदपत्रे - एमसीपी कार्ड व आरसीएच क्रमांक. - लाभार्थी महिलेचे बँक पासबुक.

संपर्क - - आशा सेविका, आरोग्य सेविका, अंगणवाडी सेविका व स्थानिक आरोग्य कर्मचारी. - जवळचे आरोग्य केंद्र. - १०४ या हेल्पलाइनवर संपर्क.

या योजनेमुळे ग्रामीण भागातील महिलांना सुरक्षित प्रसूतीसाठी प्रोत्साहन मिळत आहे. आर्थिक सहाय्यामुळे कुटुंबातील भार कमी होतो व आई- बालकाच्या आरोग्याची हमी मिळते. शासनाच्या या उपक्रमामुळे मातृत्व सुरक्षिततेकडे समाजाचा वाढत असून, आरोग्य सेवांवरील विश्वासही वाढत आहे.

## सोलापूर जिल्ह्यातील धर्मादाय आरोग्य सेवकांची यादी जाहीर

**आरोग्य सेवकाच्या माध्यम ातून धर्मादाय रुग्णालयात येणाऱ्या गरजू रुग्णांना आरोग्य सेवेचा लाभ मिळणार**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर यांनी धर्मादाय आरोग्य सेवकांची अधिकृत यादी प्रसिद्ध केली आहे. या यादीत एकूण ५ आरोग्य सेवकांचा समावेश असून, विविध रुग्णालयांमधून समाजसेवेसाठी कार्यरत असलेल्या सेवकांची माहिती देण्यात आली आहे.

यादीतील आरोग्य सेवक व रुग्णालये

- आश्विनी रूरल मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल आणि रिसर्च, सोलापूर , सेवक : सुरेंद्र नागनाथ गंगीशेट्टी (मो. ८४८५०१२२९३)

- जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी

सेवक : प्रतिक्षा बाळासाहेब गोडसे (मो. ९८३४१५८२९०)

- नर्गिसदत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल, सोलापूर

सेवक : श्री बालाजी रामलिंग घावटे (मो. ९५७९२९८३७३)

- यशोधरा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, सोलापूर

सेवक : रितेश सुरेश गायकवाड (मो. ९१७५७६२१४०)

- जनकल्याण हॉस्पिटल, पंढरपूर

सेवक : सर्जेराव वंसत गवळी (मो. ९७६३८२९७८५)

या धर्मादाय आरोग्य सेवकांच्या माध्यमातून धर्मादाय रुग्णालयांमध्ये येणाऱ्या गरजू रुग्णांना मदत, मार्गदर्शन व आवश्यक सुविधा मिळतात. शासनाच्या या उपक्रमामुळे आरोग्य सेवांमध्ये पारदर्शकता वाढून समाजातील दुर्बल घटकांना थेट लाभ मिळण्यास मदत होणार आहे.

# मातृसेवा संघ महिला व बालकांसाठी आजही निस्पृहपणे सेवाव्रत : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर : मातृसेवा संघ शताब्दी महोत्सव साजरा करत असताना सर्वसामान्य जनतेला आपल्या हक्काचे आरोग्य केंद्र म्हणून असलेली ओळख अत्यंत परिश्रमाने जपली आहे. शताब्दी महोत्सवानिमित्त मातृसेवासंघातर्फे जनसेवेच्या सर्व प्रकल्पांना तसेच नूतन महिला वसतिगृहाच्या प्रकल्पासाठी आवश्यक सर्व मदत देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली.

सीताबर्डी परिसरातील म ातृसेवा संघाच्या रंजन सभागृहात संस्थेचा १०५ वा वर्धापन दिन सोहळा तसेच स्मृतिफलकाचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी महापौर निता ठाकरे, उपम हापौर लिला हाथीबेड, संस्थेच्या अध्यक्षा डॉ.अरुणा बाभूळकर, सचिव डॉ.लता देशमुख, उपाध्यक्ष रश्मी भावे आदी उपस्थित होते.

पद्मश्री कमलाताई होस्पेट व वेणुताई नेने यांनी स्वातंर्त्यापूर्वी मातृसेवासंघाची स्थापना केली. याकाळात केवळ डफरीन येथे इंग्रज कुटुंबांच्या महिलांसाठीच प्रसुतीची व्यवस्था होती. सामान्य भगिनींनाही प्रसुतीची व्यवस्था व्हावी यासाठी मातृसेवा संघाच्या माध्यमातुन अशा सुविधा निर्माण करतांना गरिब रुग्णांसाठी निश- ुल्क सेवा दिली. या संस्थेच्या माध्यमातून सेवा भाव करतांनाच सेस्थेचे व्यावसायिकरण होऊ दिले नाही आणि आजही सेवा भाव जपला जात असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख करतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिलांच्या आरोग्यासोबतच बाल आरोग्य व बालमृत्यू थांबविण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. त्यामुळेच सूतिकागृहाच्या माध्यमातून साम ान्य माणूस संस्थेसोबत आजही जुळला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

शतक महोत्सवी वर्षानिमित्त राबविण्यात येणाऱ्या उपक्रम ांसोबतच महिला वसतिगृहाच्या इमारतीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. संकल्प चित्रानुसार इमारतीच्या बांधकामामध्ये जी मदत करता येईल ती निश्चितपणे करण्यात येईल. सुरक्षित मातृत्वासाठी वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बेटी बचाओ बेटी पढाओ व सुरक्षित मातृत्वाचा संकल्प केला आहे. त्यानुसारच मातृसेवा संघांची वाटचाल सुरु असल्याचे सांगतांना श्री.फडणवीस म्हणाले की, याक्षेत्रात कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थाचा चांगलाच सहभाग आहे. अशा संस्था आदिवासी व अतिदुर्गम भागातही कुपोषणासह महिला व बालकांच्या आरोग्य सेवेमध्ये चांगले काम करत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

शतक महोत्सवी अभिनव वृक्षारोपण

शतक महोत्सवी वर्षानिमित्त विविध उपक्रमासोबतच वृक्षारोपण मोहीम सुरु करण्यात आली असून या मोहीमेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्यासपीठावर अभिनव पद्धती- ने लिंबांचे वृक्ष लावून करण्यात आले. मुख्यमंर्त्यांनी एका कुंडीत वृक्ष लावून शतक महोत्सवी वृक्ष म्हणून संवर्धन व संगोपण करण्याची जबाबदारी मातृसेवा संघाने स्वीकारावी अशी सूचना यावेळी केली.

महापौर निता ठाकरे यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थेच्या अक्षध्या डॉ.अरुणा बाभूळकर यांनी स्वागत केले तर सचिव श्रीमती लता देशमुख यांनी प्रास्ताविकात मातृसेवा संघाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. आभार व कार्यक्रमांचे संचलन जयश्री वाघ यांनी केले. यावेळी वैद्यकीय अधिक्षीका डॉ.पुष्पा भावे तसेच संस्थेचे पदाधिकारी व सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## सुफी सय्यद शमशोद्दीन यांना मुंबई येथे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : प्रतिनिधी, सुधाकर रणदिवे, :

महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन चे संस्थापक सचिव व युवा भिम सेनेचे संस्थापक प्रवक्ते सुफी सय्यद शमशोद्दीन समाजसेवक यांना आजपर्यंत बरेच राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत.दिल्ली , कल्याण, नाशिक, पुणे, लातूर आणि आता मुंबई येथे समृद्धी पर्यटन व सांस्कृतिक विकास सेवा ट्रस्ट मुंबई आयोजित राज्यस्तरीय सामाजिक विकासरत्न प्रेरणा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या मुख्य आयोजक मिनाक्षी पाखरे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. महाराष्ट्रातून फिल्मी कलाकार, रिलस्टार, ला- वणी, मिमीक्री,लघुनाटिका,बालशाहीर तसेच बाल कलाकार सिफा पवार यानी गणेश वंदना तसेच एक त्या रायगडावर एक चवदार तळ्यावर या गितावर नृत्य सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.महाराष्ट्रातून आलेले कलाकार व सम ाजसेवकांना समानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.आकर्षक अशा सोहळ्याची सर्वत्र चर्चा होत असुन सुफी सय्यद शमशोद्दीन समाज- सेवक यांना पुरस्कार प्रदान करण्यात आल्याबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक केले जात आहे.

**भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना आढावा बैठकीत आ. समाधान आवताडे यांचे निर्देश**

# प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून योजनेला गती द्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंचायत समिती सभागृह, मंगळवेढा : मंगळवेढा येथील पंचायत समिती सभागृहात भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीस उपस्थित राहिलो.

या बैठकीत योजनेच्या प्रगतीचा सखोल आढावा घेत अंमलबजावणीतील अडचणी, तांत्रिक बाबी आणि प्रलंबित कामे यावर विस्तृत चर्चा करण्यात आली. नागरिकांना शाश्वत व अखंड पाणीपुरवठा सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने या बैठकीस विशेष महत्त्व प्राप्त झाले.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी ही योजना प्रभावीपणे आणि वेळेत पूर्ण होणे अत्यावश्यक असल्याचे अध- ोरेखित केले. कामाची गुणवत्ता, गती आणि पारदर्शकता यावर ठाम भर देत संबंधित यंत्रणांना स्पष्ट व कडक सूचना दिल्या. तसेच प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून योजनेला गती देण्याचे निर्देश दिले.

या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे परिसरातील नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडून येईल, असा ठाम विश्वास व्यक्त करत सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करत ही महत्त्वाकांक्षी योजना निश्चित वेळेत पूर्ण करावी आणि जन- तेला दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358


This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# शब्दाला जागणारे लोकनेतृत्व सचिन दादा कल्याणशेट्टी, सकल मराठा समाजाच्या स्वप्नपूर्तीचा आरंभ




## आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते सांस्कृतिक भवनाच्या मंजुरीचे पत्र प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : काही निर्णय केवळ कागदावरचे नसतात, तर ते समाजाच्या अस्मितेशी आणि भविष्याशी जोडलेले असतात. वागदरी येथील सकल मराठा समाजाची अनेक वर्षांची 'सांस्कृतिक भवनाची' मागणी आज पूर्णत्वाकडे जात आहे, आणि याला कारणीभूत ठरले आहे ते म्हणजे शब्दाला जागणारे आपले लोकनेते आमदार श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी!

मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक चळवळीला हक्काचे व्यासपीठ मिळावे, या उदात्त हेतूने दादांनी आपल्या स्थानिक विकास निधीतून (आमदार निधी)सांस्कृतिक भवन साठी पहिल्या टप्प्यात ₹१५,००,०००/- (पंधरा लाख रुपये) निधी मंजूर केला आहे.

आज स्वतः आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते या सांस्कृतिक भवनाच्या मंजुरीचे पत्र प्रदान करण्यात आले.यावेळी निधी दिल्याबद्दल सकल मराठा समाज वागदरी यांच्यावतीने आदरणीय दादांचा सन्मान करण्यात आले.

केवळ निधी मंजूर करून दादा थांबले नाहीत, तर हा तर फक्त पहिला टप्पा आहे, आपल्या मराठा समाजाच्या या वास्तूला भविष्यातही निधीची कोणतीही कमतरता पडू देणार नाही असा शब्द देऊन त्यांनी समाजाप्रती असलेली आपली ओढ आणि बांधिलकी पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

समाजाच्या प्रगतीसाठी, तरुणांच्या भविष्यासाठी आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी खंबीरपणे पाठीशी उभे राहणाऱ्या सचिनदादांच्या या दातृत्वामुळे संपूर्ण वागदरी येथील मराठा समाजात आनंदाचे आणि कृतज्ञतेचे वातावरण आहे.

यावेळी सकल मराठा समाज वागदरीचे अध्यक्ष श्री प्रदीप पाटील सर, श्री प्रदीप जगताप, श्री बसवराज शेळके, श्री शिवाजी सावंत,श्री सुनील सावंत, श्री मारुती शिंदे,श्री श्याम बाबर,श्री बसवराज पाटील,श्री राम मोरे, श्री अक्षय सावंत, श्री संतोष पोमाजी, श्री शिवराज पोमाजी, श्री दिलीप सावंत,श्री राज शिंदे , श्री नागनाथ अवताडे, श्री एकनाथ माने, श्री स्वामीराव यादव, श्री बाबू मोरे, श्री सिद्धाराम जावळकोटी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# अवैध प्रवासी वाहतुकीवर पडघा पोलिसांचा अंकुश; कारवाईचे सत्र सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी /मिलिंद जाधव : कल्याण-मुरबाड मार्गावरील रायते येथे झालेल्या भीषण अपघातात ११ जणांचा मृत्यू झाल्यानंतर अवैध प्रवासी वाहतुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या दुर्घटनेची आठवण अजूनही नागरिकांच्या मनातून पुसली गेलेली नसताना, अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी पडघा पोलिसांनी कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. पडघा परिसरात काळी-पिवळी जीप, व्हॅन तसेच रिक्षांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी कोंबून वाहतूक केली जात असल्याच्या तक्रारी वाढत होत्या. भाड्याच्या हव्यासापोटी चालक प्रवाशांच्या जीवाशी खेळ करत असल्याचे चित्र दिसून येत होते. या पार्श्वभूमीवर पडघा ते भिवंडी आणि पडघा ते कल्याण या मार्गांवरील अवैध प्रवासी वाहतुकीवर पोलिसांनी विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

**रायते येथील भीषण अपघातानंतर प्रशासन सतर्क; नियमभंग करणाऱ्या चालकांवर कडक कारवाईचा इशारा**

पडघा परिसरात वाढती लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि वाहनांची वाढती संख्या यामुळे रस्त्यांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. बाजारपेठा, शैक्षणिक संस्था आणि महामार्गांना जोडणाऱ्या रस्त्यांवर दररोज वाहतूक कोंडी होत असून, नियोजनाच्या अभावामुळे परिस्थिती अधिकच गंभीर होत आहे. या पार्श्वभूमीवर, पडघा स्टेशनचे पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पडघा पोलिस ठाण्याने अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात कारवाईचे सत्र सुरू केले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर दंडात्मक कारवाईसह कठोर पावले उचलली जाणार असल्याचा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देत, अशा प्रकारच्या जीवघेण्या वाहतुकीला आळा घालण्याचा निर्धार पोलिस प्रशासनाने व्यक्त केला असून, प्रवाशांनीही नियमांचे पालन करत सुरक्षित प्रवास करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# कोळी महासंघाच्या वतीने प्रमोद भोसले यांचा यथोचित सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर येथील निलेश पंचवीस वर्षे पत्रकार म्हणून पंढरपूर शहर व तालुक्यामध्ये काम करत आहेत. श्री प्रमोद भोसले हे दैनिक वर्तमान क्रांतीचे सोलापूर क्राईमचे मुख्य म्हणजे प्रमुख झाल्याने त्यांच्या. कोळी महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष अरुण भाऊ कोळी यांच्या शुभहस्ते हार व श्रीफळ शाल देऊन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला यावेळी प्रमोद भैया कोळी, अथर्व गायकवाड राहुल पाटील आणि मान्यवर उपस्थित होते यावेळी अरुण भाऊ कोळी यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत व पत्रकार क्षेत्रातील अनुभव असलेली दैनिक वर्तमान क्रांती यांनी सोलापूर जिल्हा क्राईम न्यूज ची प्रमुख केले आहे या निवडीचे अहमद भोसले यांचे सर्वत्र अभिनंदन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.



# राज्यस्तरीय धनगर समाजाची २४ मे रोजी वधू - वर पालक परिचय मेळाव्याचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापुरात राज्यस्तरीय दहावा धनगर समाज वधू-वर पालक परिचय मेळावा रविवार दिनांक २४ मे रोजी सुंदर मल्टीपर्पज हॉल, नेहरू नगर बस स्टॉप शेजारी विजापूर रोड सोलापूर येथे आयोजित केल्याची माहिती संस्थेचे सदस्य भाऊसाहेब चोरमले यांनी माहिती दिली.



या मेळाव्यात इच्छुक वधू-वरांची नाव नोंदणी मोफत असून घटस्फोट विधवा विदुर सर्व शाखेतील समाज बांधवांनी नोंदणी करावी व आपल्या नातेवाईकांच्या पाल्यांची २० एप्रिल पर्यंत नोंदणी करावी नोंदणीसाठी रवींद्र नागनेकरी संस्थापक अध्यक्ष (९४२१०४१२१३) अध्यक्ष सुहास गडदे (९४२०४९०७२५) उदयकुमार ढगले (९५५२५८६६५१) सौ ललिता लवटे (९४०३१४३४९९) यांच्याशी संपर्क साधावा मेळावा सकाळी दहा ते दुपारी तीन वाजेपर्यंत असेल याची सर्वांनी नोंद घेऊन वेळेत उपस्थित राहावे असे आव्हान धनगर समाज वधू वर सूचक मंडळाकडून करण्यात आलेले आहे.

# पिंपळा (बु) येथील सोहम कोकरे या विद्यार्थ्याचे घवघवीत यश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुळजापूर/प्रतिनिधी : पिंपळा (बु), ता. तुळजापूर येथील चि सोहम कोकरे इयत्ता १ ली या विद्यार्थ्याने मंथन सामान्यज्ञान स्पर्धेत केंद्र आणि तालुक्यात प्रथम, जिल्ह्यात ९ वा तर राज्यात १४ वा क्रमांक पटकवून गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

समस्त पिंपळा (बु) ग्रामस्थांसाठी ही अभिमानास्पद गोष्ट असल्यामुळे या विद्यार्थ्याचा सत्कार सर्वांच्या वतीने शाळेमध्ये करण्यात आला. जि. प. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी अशीच प्रगती करत सर्वोच्च शिखरे गाठावीत अशा भावना यावेळी उपस्थित नागरिकांच्या वतीने व्यक्त करण्यात आल्या.

**सामान्यज्ञान स्पर्धेत केंद्र आणि तालुक्यात प्रथम, जिल्ह्यात ९ वा तर राज्यात १४ वा**

याप्रसंगी पं. स. सदस्या सौ. संगिता गवळी, शिवसेना ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख जगन्नाथ गवळी, सरपंच सौ. गीताताई वाघमोडे, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष बालाजी चुंगे, ग्रा. पं. सदस्य संग्राम राजेपांढरे, बागायतदार रामदास चौगुले, सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग म्हेत्रे, प्रशांत कोकरे, माजी सरपंच सौ. उषा वाघमोडे, रिजवाना शेख यांच्यासह सर्व शिक्षकवृंद व अनेक नागरिक उपस्थित होते.

**कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी, पोलिस प्रशासनाला दिले निवेदन**

# वारकरी संप्रदाय व संप्रदायातील मान्यवर महाराज मंडळींची बदनामी केल्याबद्दल गुन्हा दाखल करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : वारकरी संप्रदाय व पंढरपूर शहरातील प्रतिष्ठित मान्यवर यांनी दिलेल्या तक्रारीवरून मा.वरिष्ठ पोलिस निरीक्षक पंढरपूर शहर यांनी श्री.विकास लवांडे यांच्यावर प्राथमिक दृष्टीने भारतीय न्याय संहिता ३५२ नुसार गुन्हा दाखल केला आहे.व यासंदर्भात आणखी कोणत्या कलमांची वाढ करावी या संदर्भात प्रशासनाचा वरिष्ठांशी विचारविनिमय सुरु आहे.

फक्त गुन्हा दाखल करुन नव्हे तर वारकरी संप्रदायातील महाराज मंडळींची बदनामी करण्यामागे नेमकं कोण आहे व त्यांचा आणखी नेमका काय उद्देश आहे हे जाणून घेण्यासाठी लवांडेना तात्काळ प्रशासनाने ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी करावी अशी विनंती करण्यात आली आहे.

वारकरी संप्रदाय व पंढरपूर शहरातील प्रतिष्ठित मान्यवर यांनी दिलेल्या तक्रारीचा मसुदा खालील प्रमाणे....=ऋ=ऋ

दि. ११ एप्रिल रोजी प्रसार माध्यमांवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (श.प.गट ) अध्यक्ष श्री.शरद पवार साहेब यांनी वारकरी संप्रदायावर टिकात्मक वादग्रस्त लेखन केल्याची बातमी पाहण्यात आली. त्यातील आमच्या पर्यंत प्राप्त झालेले लेखन असे होते.

दुसरीकडे वारकरी संप्रदायासारख्या समतेच्या चळवळीतही हे प्रतिगामी लोक घुसखोरी करू लागले आहेत. वारकरी संप्रदायामध्ये ६०% लोक हे बोलताना धर्मांध शक्तींना अधिक बळ मिळेल अशा पद्धतीने मांडणी करतात. म्हणून आता आम्ही यादी करायला सुरुवात केली आहे. आता साधारण चाळीसएक लोक असे दिसतात की ते वारकरी संप्रदायांमध्ये कीर्तन प्रवचन यामधून पुरोगामी भूमिका मांडत असतात. त्यांची अत्यंत गरज आहे. दुर्दैवाने या प्रबोधनाच्या मार्गावर कुठे महिला दिसत नाहीत. महिलांची बदनामी करणारे, त्यांच्यावर टवाळ विनोद करणारे वाढत चालले आहेत. अशा विनोदांना हसणाऱ्या महिला प्रेक्षकांत दिसतात. दुसरीकडे प्रतिगामी विचार मांडणाऱ्या महिला कीर्तनकारांची संख्या मात्र वाढताना दिसते हे दुर्दैव आहे.

वारकरी संप्रदाय हिंदू धर्मातील विठ्ठल रुक्मिणी उपास्य देवता व रामकृष्ण हरि मंत्र असणारा , तुकाराम गाथा, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत हे प्रस्थानत्रयी ग्रंथ व सकल वारकरी संत वाङ्मय अधिष्ठान माननारा एक अस्तिक उपासना पंथ आहे. तरीसुद्धा पवारांसारखी अनेक स्वतःचा उल्लेख 'नास्तिक ' असा करणारी मंडळी विनाकारण वारकरी संप्रदायाच्या बदनामीच्या उद्देशाने संप्रदायाला हिंदू धर्मापासून तोडून निधर्मी ठरवण्याचा व स्वतःच्या पुरोगामित्वाच्या नावाखाली चालवलेल्या नास्तिक चळवळीकडे नेण्याचा प्रयत्न सातत्याने करत असतात. वरील लेखन त्याचाच भाग आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे या लेखनाच्या वादानंतर दोन दिवसांत राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.घट) प्रवक्ते विकास लवांडे यांनी पत्रकार परिषदेद्वारे अत्यंत वादग्रस्त पद्धतीने वारकरी संप्रदायात पुज्यस्थानी असणाऱ्या मान्यवर महाराज मंडळींची नावे वारकरी संप्रदायातील 'घुसखोर ' म्हणून जाहीर केली यामध्ये... सर्वश्री ह.भ.प. स्वामी श्री गोविंददेवगिरीजी, चारुदत्त आफळे बुवा, बंडातात्या कराडकर, प्रकाश महाराज जवंजाळ, आचार्य तुषार भोसले, अक्षय महाराज भोसले, संग्राम बापू भंडारे, योगी निरंजननाथ गुरु शांतीनाथ, श्रीएकनाथ महाराज सदगीर, श्रीज्ञानेश्वर महाराज जळकीकर, संजय महाराज पाचपोर, श्रीभास्करगिरी महाराज, संजयनाना धोंडगे, देवव्रत महाराज वासकर, चंद्रशेखर महाराज देगलूरकर, उद्बोध महाराज पैठणकर, किशोर महाराज शिवणीकर, महंत रामगिरी महाराज, श्री भारतानंद सरस्वती व श्री निरंजन शास्त्री कोठेकर



अशा एकूण संप्रदायातील जेष्ठ श्रेष्ठ अभ्यासू मान्यावरांचा उल्लेख हा 'घुसखोर' असा शिवीवाचक करणे, या सर्वाविषयी समाज मनामध्ये संभ्रम निर्माण करणे, यांच्या सर्व भक्तगणांच्या धार्मिक भावना दुखावणे, समाजाचे स्वास्थ्य बिघडवून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न करवणे, या सर्वांची बदनामी घडवून वारकरी संप्रदाय पंथाचे व हिंदू धर्माचे नुकसान होऊन या पंथाकडे जाऊन समाज अस्तिक विचारांचा व विवेकवाद जोपासणारा न होता तो आपल्या विचाराला लागून नास्तिक व अविवेकी व्हावा व समाजात पुन्हा जातीभेद पसरुन वाद विवाद उत्पन्न होऊन त्याचा राजकीय लाभ घ्यावा अशा अनेक उद्देशाने विकास लवांडे यांनी केवळ हेतूपुरस्सर या विद्वान व पुज्य व्यक्तीमत्वांचा अत्यंत वादग्रस्त वक्तव्य करत नावे जाहीर केली आहेत.

त्यामुळे भारतीय न्याय संहितेनुसार कठोरातील कठोर कलमे लावून सदर व्यक्तीवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी . वारकरी संप्रदायात अत्यंत संतापाची लाट उसळली असल्याने कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी विकास लवांडे यांना पोलीस प्रशासनाने तात्काळ ताब्यात घेऊन हे सर्व कृत्य करण्यामागील कारणमिमांसा जाणून घेण्यासाठी, तसेच या मागे आणखी कोण कोण सुत्रधार आहेत हे जाणून घेण्यासाठी त्यांची कसुन चौकशी करावी. हि चौकशी पुर्ण होईपर्यंत त्यांना पोलीसांच्या ताब्यातच ठेवावे अन्यथा ते आपला विद्वेष पसरवण्याचे काम पुर्ण झाले आहे असे गृहीत धरुन काही दिवसाकरीता भुमिगत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी तात्काळ त्यांना ताब्यात घेतले जावे.

तरी वारकरी संप्रदायाच्या तीव्र भावना लक्षात घेऊन तात्काळ कारवाई करावी हि विनंती!

# अक्कलकोटमध्ये बैलगाडा शर्यतींचा थरार वाढला; पशुसंवर्धन आणि पारंपरिक क्रीडा प्रकाराला चालना

### सागरदादा कल्याणशेट्टी मित्रपरिवार आयोजित हन्नूर केसरी पर्व - ५ वे; सर्जा अन् सुंदरने मिळविले अडीच लाखांचे बक्षीस; हन्नूर केसरी बैलगाडा शर्यतीत तब्बल १२६ बैलजोड्यांचा सहभाग; हन्नूर ठरतंय बैलगाडा शर्यतीचे बलशाली केंद्र






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/कमलाकर सोनकांबळे : पंचायत समिती अक्कलकोटचे उपसभापती सागर दादा कल्याणशेट्टी गेल्या पाच वर्षापासून सदर स्पर्धा घेत असून यांची संपूर्ण महाराष्ट्रात चर्चा होत आहे

अक्कलकोट तालुक्यातील शेतकरी हे कारहुणवीचा सण मोठ्या उत्साहाने साजरा करतात. यातून बैलांविषयीचा प्रेम शेतकरी या सणातून व्यक्त करतात. परंतु, याला जोड मिळत अलीकडच्या अक्कलकोट तालुक्यात बैलगाडा शर्यतींचा थरार वाढत चालल्याचे सकारात्मक चित्र मिळत आहे. काळात पाहायला बैलगाडा शर्यत हा खेळप्रकार जुन्या काळापासून चालत आला आहे. बैलगाडा शर्यत हा महाराष्ट्राचा पारंपरिक खेळ म्हणून ओळखला जातो. बैल जनावरांतील खिल्लार जात काही दिवसात नामशेष होईल, अशी स्थिती निर्माण झाली आहे. गेल्या पाच वर्षांपासून बैलगाडा शर्यत हा खेळप्रकार सुरू झाल्यापासून अक्कलकोट तालुक्यातील प्रत्येक गावात बैलांचे संवर्धन करणारे शेतकरी वाढत चालल्याचे सकारात्मक चित्र दिसून येत आहे.

वास्तविक अक्कलकोट तालुक्यात अलीकडच्या काळात यंत्रसामुग्री, ट्रॅक्टरच्या वापरामुळे पशुधनाचे महत्त्व कमी होत चालले होते. परंतु, विविध गावांमधील जाणकार व्यक्तींनी सढळपणे बक्षिसे ठेवून, स्पर्धे निमित्त भोजन व्यवस्था, आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून बैलगाडा शर्यतींचे यशस्वी नियोजन करत असल्याने गेल्या पाच वर्षांत पशुधनाकडे पाहण्याचा सर्वांचाच दृष्टिकोन सकारात्मक होत चालला आहे.

पूर्वी बैलगाडा शर्यतीचा थरार हा पुणे व मराठवाड्यातील जिल्ह्यात विविध ठिकाणी जोमाने चालायचा. हा थरार पाहण्यासाठी अक्कलकोट तालुक्यातील हजारो शेतकरी बांधव स्वखर्चाने गाड्या करून जायचे. बैलांच्या विविध जाती पाहायला मिळाल्याने अशी परिस्थिती आपल्याकडेही निर्माण व्हावी, अशी सुप्त इच्छा शेतकऱ्यांना होऊ लागली. अलीकडच्या काळात पंचायत समितीचे सभापती सागर कल्याणशेट्टी यांनी हन्नूर येथे सलग पाचव्या वर्षी हन्नूर केसरी बैलगाडा शर्यतीचे आयोजन करत या पारंपरिक खेळप्रकारास मोठी चालना दिली आहे.

अक्कलकोट पंचायत समितीचे उपसभापती सागर कल्याणशेट्टी यांच्या पुढाकारातून झालेल्या हन्नूर केसरी बैलगाडा शर्यत २०२६ या स्पर्धेत तब्बल १२६ बैल जोड्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत सिद्धेश्वर ग्रुप तोळणूर यांचा सर्जा आणि सुंदर बैलजोडीने २ लाख ५० हजार रुपयांचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटकाविले.

स्पर्धेचे बक्षीस वितरण आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे व इतर मान्यवरांच्या हस्ते रविवारी सायंकाळी करण्यात आले. यावेळी महापौर विनायक कॉड्याल, भाजप नेते शहाजीराजे पवार, हिंद केसरी उर्मिला गायकवाड, जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, कृषी पशुसंवर्धन सभापती रामप्पा चिवडशेट्टी, सागर हिप्परगी, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, जि.प. सदस्य नेताजी खंडागळे, दुधनी बाजार समितीचे सभापती सातलिंगप्पा परमशेट्टी आदी उपस्थित होते.

आ. कल्याणशेट्टी म्हणाले, बैलगाडा शर्यत ही आपल्या ग्रामीण संस्कृतीची ओळख आहे. अशा स्पर्धांमुळे शेतकऱ्यांना नवी उभारी मिळते. खिलार जातीच्या संवर्धनासाठी अशा उपक्रमांची गरज आहे. उपसभापती सागर कल्याणशेट्टी यांनी घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद आहे. आमदार देवेंद्र कोठे यांनीही उपक्रमास शुभेच्छा देत संयोजकांचे अभिनंदन केले.

मित्र सागर कल्याणशेट्टी परिवाराच्यावतीने या बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते.

> **बैलगाडा शर्यतीमधून लोक एकत्र येतात. पशुसंवर्धनाला चालना देण्यासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्त्वाखाली सर्वप्रथम हन्नूर येथे बैलगाडा शर्यत सुरू केली. या बैलगाडी शर्यतीला तालुक्यातून प्रतिसाद मिळत आहे.**
> **– सागर कल्याणशेट्टी, उपसभापती.**

#### हन्नूर केसरी बैलगाडा शर्यत

**सागरदादा कल्याणशेट्टी मित्रपरिवार आयोजित 'हन्नूर केसरी पर्व – ५ वे' या भव्य बैलगाडा शर्यतीस संपन्न झाला. अक्कलकोट मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते अंतिम फेरीतील १ ते ६ क्रमांकाच्या विजेत्या बैलगाड्यांचा सन्मान करण्यात आला. आयोजकांनी मैदानाचे अत्यंत नियोजनबद्ध व शिस्तबद्ध आयोजन केल्यामुळे शर्यतप्रेमींना रोमांचक आणि सुसाट थरार अनुभवता आला.**

**या प्रसंगी आमदार मा. श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी, आमदार देवींद्र कोठे, सोलापूर महापालिकेचे महापौर श्री. विनायक दादा कोंड्याल, कार्यकारिणी सदस्य श्री. शहाजीभाऊ पवार, नगराध्यक्ष श्री. मिलनदादा कल्याणशेट्टी, जिल्हापरिषद उपाध्यक्ष श्री. इंद्रजीत पवार, श्री. सागरदादा कल्याणशेट्टी, नगरसेवक बिजू प्रधाने यांच्यासह हन्नूर गावातील मान्यवर आणि मोठ्या संख्येने बैलगाडा शर्यत प्रेमी उपस्थित होते.**

#### या बैलजोड्या ठरल्या बक्षिसाच्या मानकरी

**१) सिद्धेश्वर ग्रुप तोळणूर यांचा सर्जा आणि सुंदर प्रथम–दोन लाख ५० हजार**
**२) कचरेवाडीकरांचा सुंदर आणि रुबाब द्वितीय बक्षीस १ लाख २५ हजार**
**३) हन्नूरचा बलमा आणि तेजा तृतीय बक्षीस ७५ हजार**
**४) माळशिरसचा प्रधान आणि नाग्या चौथे बक्षीस ५१ हजार**
**५) पंढरपूरची बैलजोडी – पाचवे बक्षीस ३५ हजार**
**६) चपळगावचा शाहीर आणि राणा – सहावे बक्षीस २५ हजार**

---



# महात्मा बसवेश्वर यांची जयंती पंढरीत उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी : समतानायक, आद्य समाज सुधारक जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांची ८९५ जयंती महाराष्ट्र वीरशैव सभा या संघटनेच्या माध्यमातून अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली या कार्यक्रमाच्या प्रारंभिक महात्मा बसवेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन माजी नगरसेवक सन्माननीय निराश डोंबे यांच्या शुभहस्ते करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सन्माननीय श्री नंदकुमार कट उपस्थित होते.

महाराष्ट्र वीरशैव सभेचे जिल्हाध्यक्ष मा श्री अँड राजेश भादुले, शिवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष मा श्री राजेंद्र भिंगे, ज्येष्ठ मार्गदर्शक मा श्री राजकुमार जेठे सर यांनी महात्मा बसवेश्वर यांचे विचार व कार्याबद्दल समायोजित मनोगत व्यक्त केले.

यानंतर समाज बांधव व आयसीसी बँकेचे मॅनेजर मा श्री राजेश हुंडेकरी यांच्या चिरंजीव श्रेयस एसएससी परीक्षेत ९० टक्के मार्क्स प्राप्त करून उत्तीर्ण झाल्याबद्दल चि. श्रेयाचा अभिनंदन व शिवसेना शिंदे गटाचे नेते मा श्री ओंकार बसवंत यांनी लिंगायत स्मशानभूमीची सुधारणा करण्याकरिता आपल्या राज्याची सन्माननीय उपमुख्यमंत्री माननीय एकनाथजी शिंदे साहेब यांच्या माध्यमातून दहा लाख रुपये निधी मंजूर केल्याबद्दल बसवंती यांच्या पती कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता संघटनेच्या माध्यमातून यथोचित सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाची प्रास्ताविक व सूत्रसंचालन संघटनेचे शहराध्यक्ष श्री विशाल आर्वी यांनी केले तर शेवटी उपस्थित आमचे आभार तालुकाध्यक्ष श्री धनंजय मेनकुदळे यांनी मांडली याप्रसंगी शिवसेनेचे युवा नेते श्रीनिवास उपळकर सौरभ भादुले आनंद मेनूकुदळे, अनिल डोंबे उमेश वायचळ बसवराज सरळे प्रशांत मेनकुदळे, सोहम भिंगे महेश विभुते विश्वनाथ कावळे राजाभाऊ शेटे संजय मामाने विशाल डोंगरे वेदांत पाटील विश्वास ठेंगडे सिद्धेश्वर शिळे प्रथम भिंगारे गिरीश पंतोजी सुरज पावले आदी मान्यवर उपस्थित होते.

# सिंदगाव येथे विधवा, निराधार, परित्यक्ता, एकल महिलांची सह विचार सभा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : परिवर्तन सामाजिक संस्था बोरगाव/नळदुर्ग ता.तुळजापूर अंतर्गत साऊ महिला संघटनेचे वतीने शिंदगाव ता.तुळजापूर येथे विधवा,निराधार,परित्यक्ता, एकल महिलांची सहविचार सभा घेण्यात आली.

यावेळी परिवर्तन सामाजिक संस्थेचे सचिव तथा मिशन वात्सल्य समिती तुळजापूर चे अशासकीय सदस्य मारुती बनसोडे यांनी या महिलाना शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली गावातील महिलांच्या विविध समस्या समजून घेतल्या.यात २० महिला उपस्थित होत्या. त्या पैकी चार महिलाना घरकुल मिळाले नाही. दोन महिलांच्या मुलांना बालसंगोपन योजनेचा लाभ मिळत होता तो अचानक बंद झाला आहे. एक घटस्फोटीत महिला आहे तिला ५ ववर्षाचा मुलगा आहे कोणत्याही योजनेचा लाभ मिळाला नाही अशा अनेक समस्या या सभेतील चर्चेतून समोर आल्या आहेत.

या प्रसंगी मारूती बनसोडे पुढे बोलताना म्हणाले की शासन विधवा, परितक्ता, घटस्फोटीत एकल महिलासाठी, पूर्ण अनाथ, अर्ध अनाथ मुला मुलीसाठी अनेक योजना राबवित आहे. त्या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी महिलानी पुढे आले पाहिजे. महाराष्ट्रात हेरंब कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली एकल महिला संघटना काम करीत आहे तर धाराशिव जिल्ह्यात विजय काका जाधव व मारुती बनसोडे कोरोना कालावधीपासून या प्रश्नावर काम करीत आहे तरी गरजू महिलांनी त्यांच्या माध्यमातून शासकीय योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न करावा.

हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी कमल पाटील यांनी परिश्रम घेतले.यावेळी एकल महिला सह कार्यकर्ते उपस्थित होते.

---

### ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. विश्वासराव मोरे यांची माहिती

# स्वेरीत 'जागतिक पशुवैद्यक दिना' निमित्त येत्या शनिवारी तांत्रिक परिसंवादा'चे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : जागतिक पशुवैद्यक दिना' निमित्त ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठान, पंढरपूर यांच्या वतीने शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ रोजी गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींग(ऑटोनॉमस) मध्ये तांत्रिक परिसंवादा'चे तसेच स्व. डॉ. सुहास देशपांडे जीवन गौरव पुरस्कार' व स्व. डॉ. चंद्रकांत निंबाळकर उत्कृष्ट पशुवैद्यक पुरस्कार' या उपक्रमांचे आयोजन केले आहे.' अशी माहिती पंढरपुरातील ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. विश्वासराव मोरे यांनी दिली.

या कार्यक्रमाअंतर्गत सकाळी ९ ते ९.३० नोंदणी, अल्पोपहार आणि चहा हा कार्यक्रम तर त्यानंतर सकाळी ९.३० वाजता पुणे विभागाचे प्रादेशिक पशुसंवर्धनचे सहआयुक्त डॉ. संतोष पंचपोर यांच्या अध्यक्षतेखाली श्री व. च. कामधेनु विश्व विद्यालय दुर्ग चे माजी कुलगुरू प्रा. डॉ. एन.पी. दक्षिणकर यांचे अँटीमायक्रो बॅक्टेरियल रजिस्टन्स अँड इट्स रॅशनल अप्रोच' या विषयावर तसेच सकाळी १०.३० वा परभणीच्या पशुवैद्यक महाविद्यालयाचे माजी सहयोगी अधिष्ठाता प्रा. डॉ. नितिन मार्कंडे यांचे पशुवैद्यकीय क्षेत्रापुढील आव्हाने: काल, आज आणि उद्या' या विषयावर तांत्रिक परिसंवादाचा' कार्यक्रम होणार आहे.

यावेळी पुणे पशुसंवर्धन विभागाचे प्रादेशिक सहआयुक्त डॉ. समीर बोरकर यांच्या अध्यक्षतेखाली पुणे पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शितलकुमार मुकणे व स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या शुभहस्ते स्व. डॉ. सुहास देशपांडे जीवन गौरव पुरस्कार' व स्व. डॉ. चंद्रकांत निंबाळकर उत्कृष्ट पशुवैद्यक पुरस्कार' वितरीत केले जाणार आहेत.

यावेळी जीवन गौरव पुरस्कारार्थी प्रा. डॉ. नितीन मार्कंडे व डॉ. संतोष पंचपोर तसेच पशुसंवर्धन पुणे विभागचे माजी सहआयुक्त डॉ.अंकुश परिहार, सातारा पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. दिनकर बोर्डे, पशुसंवर्धन विभाग कोल्हापूरचे उपायुक्त डॉ. प्रमोद बाबर, सांगलीचे उपायुक्त डॉ. अजय थोरे, सोलापूरचे उपायुक्त डॉ. अनिल तांबे, सांगलीचे सहआयुक्त डॉ.विजय डोके आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. विश्वासराव मोरे, सचिव डॉ. अनिल सरदेशमुख व मार्गदर्शक डॉ. टी.एन. बेले, डॉ. राज सावळकर, डॉ. प्रवीण जाधव, डॉ. तानाजी भोसले, शिवराजे पवार यांच्यासह पशुवैद्यक प्रतिष्ठानचे पदाधिकारी व सदस्य परिश्रम घेत आहेत.

या कार्यक्रमासाठी सोलापूर जिल्ह्यासह इतर जिल्ह्यांतील सर्व पशुधन विकास अधिकारी उपस्थित राहणार आहेत. यासाठी महाव्हेटचे अध्यक्ष डॉ. सत्यजित पाटील, राज्य उपाध्यक्ष डॉ. विजय कोळेकर, पशुसंवर्धन पंढरपुरचे सहा.आयुक्त डॉ. संजय हिंगमिरे, पशुसंवर्धन सहा.आयुक्त डॉ. तानाजी खांडेकर आदी या कार्यक्रमाचे प्रायोजक आहेत.